<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>
<u>**महापालिका सर्वसाधारण सभा**</u>

महानगरपालिकेच्या शनिवार, दिनांक 17/10/2015 रोजी भरलेल्या माहे ऑक्टोंबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | <u>मंजूर.</u> |
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | **क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचा दिनांक 04 सप्टेंबर 2015 चा ठराव क्र. 2 :-**<br>संदर्भ :- आयुक्तांचे दिनांक 31/08/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/क्रिडा व सांस्कृ/372/2015.<br>महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात यावी की, आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, सन 2015-2016 या आर्थिक वर्षात प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती अंतर्गत विविध स्पर्धा/कार्यक्रम/उपक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च "क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमावरील खर्च" या लेखाशिर्षाखाली तरतूद रक्कमेतून भागविण्यास आणि या अनुषंगाने येणाऱ्या संभव्य रक्कम रुपये 192.30 लक्ष इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी. |
| <u>**ठराव क्र. 577.**</u><br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, सन 2015-2016 या आर्थिक वर्षात प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती अंतर्गत विविध स्पर्धा/कार्यक्रम/उपक्रम राबविण्यासाठी येणारा खर्च "क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमावरील खर्च" या लेखाशिर्षाखाली तरतुद रक्कमेतून भागविण्यास आणि या अनुषंगाने येणा-या संभाव्य रक्कम रुपये 192.30 लक्ष इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | सन 2015 - 2016 या शैक्षणिक वर्षामध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रात परिमंडळ-1 व परिमंडळ-2 या ठिकाणी प्रायोगिक तत्वावर रात्रशाळा सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/09/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/शिक्षण/17/2015. |
| **<u>ठराव क्र. 578.</u>**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | सन 2015-2016 या शैक्षणिक वर्षामध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रात परिमंडळ-1 व परिमंडळ-2 या ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे 02 माध्यमिक रात्रशाळा प्रायोगिक तत्वावर सुरु करणेस प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 66(21) अन्वये तसेच त्यासाठी लागणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या नियुक्ती करण्यास तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनावर होणाऱ्या वार्षिक खर्च रुपये 9 लाख 33 हजार 336 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | <u>मंजूर</u> |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील दुकान गाळे/कार्यालये 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/09/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1114/2015 |
| **<u>ठराव क्र. 579.</u>**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील घणसोली गांव व भुखंड क्र. 160, से. 44, करावे येथील मार्केट गाळे प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह स्तंभ क्र. 02 मधील नमुद व्यक्ती यांनी स्तंभ क्र. 06 मध्ये जास्तीत जास्त सुरक्षा अनामत रक्कम |

| | |
|---|---|
| | नमूद केली असल्यामुळे संबंधितास स्तंभ क्र. 04 मध्ये नमुद केलेल्या मासिक भाडेदराने 05 वर्षाच्या कालावधीकरीता प्रति वर्षी 10% भाडे वाढीसह "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे देण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | मंजूर |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | भुखंड क्र. 71, 72, 73 से. 11 सी.बी.डी., बेलापुर येथील पार्किंग व कॅफेटेरीया मधील किऑक्स (Kiosk) 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/09/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/1116/2015. |
| **ठराव क्र. 580.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | भुखंड क्र. 71, 72, 73 से. 11, सी.बी.डी., बेलापूर येथील पार्किंग व कॅफेटेरीया मधील किऑक्स (Kiosk) क्र. 01, 04, 17, 32, 35 प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तक्ता क्र. 02 मधील स्तंभ क्र. 02 मध्ये नमुद व्यक्ती/संस्था यांनी स्तंभ क्र. 07 मध्ये जास्तीत जास्त सुरक्षा अनामत रक्कम नमूद केली असल्यामुळे संबंधितास स्तंभ क्र. 05 मध्ये नमुद केलेल्या मासिक भाडेदराने 05 वर्षाच्या कालावधीकरीता दरवर्षी 10% भाडे वाढीसह "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे देण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी |
| **निर्णय -** | मंजूर |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | बेलापूर विभागातील सेक्टर-30/31, आग्रोळी गा.वि.यो. येथे नवीन मल:निस्सारण वाहिनी टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/09/2015 चे पत्र क्र. नमुंमपा/अ.श.अ./669/2015. |

| | |
|---|---|
| **ठराव क्र. 581.**<br>**दिनांक 17 ऑक्टोंबर 2015** | बेलापूर विभागातील सेक्टर-30/31, आग्रोळी गा.वि.यो. येथे नवीन मल:निस्सारण वाहिनी टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 49 लाख, 69 हजार, 105 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीच्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी. |
| **निर्णय -** | मंजूर |

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्ताकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी.

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 93 मध्ये काही ठिकाणी सी.सी.टी.व्ही. लावण्यात आले आहेत. उर्वरीत ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिके मार्फत सी.सी.टी.व्ही. लावण्यात यावे. जेणेकरुन सुरक्षेच्या दृष्टीने सोयीस्कर होईल व चो-या होण्याच्या प्रमाणात आळा बसेल. | 7<br>ऑक्टोंबर | 582<br>17/10/2015 | मंजूर |
| 2. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>नेरुळगाव शाळा क्र. 10 येथे शाळेचे मैदानाचे सपाटीकरण करुन सदर ठिकाणी शाळेतील गावातील मुलांना खेळण्यासाठी खेळणी बसविण्यात यावी जेणेकरुन मुलांना खेळता येईल. | 8<br>ऑक्टोंबर | 583<br>17/10/2015 | मंजूर |
| 3. | **श्री. नामदेव रामा भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 93, नेरुळगाव येथे पथदिवे जुने असल्याने खराब झाले आहेत सदरच्या ठिकाणी नवीन खांब व फिटींग लावण्यात यावी जेणेकरुन नागरिकांना ये-जा करण्याकरीता गैरसोय होणार नाही. | 9<br>ऑक्टोंबर | 584<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **4.** | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यु रोगाच्या साथीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नव्या मुंबईतील जनतेच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या मानाने नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात साफ सफाई कामगार, बहुउददेशिय आरोग्य कर्मचारी, डास आळीनाशक फवारणी-धुरीकरण कामगार तसेच सार्वजनिक रुग्णालय वाशी या रुग्णालयातील स्टाफ नर्स व इतर अत्यावश्यक विभागातील कर्मचारी जे सध्या काम करीत आहेत ते कमी आहेत, अपुरे पडत आहेत. त्या कामगारांत वाढ करणे गरजेचे आहे. तरी शासनाने आरोग्य विभागासाठी भरती करण्यासाठी जे नियम केले आहेत त्या नियमानुसार वरील विभागातील कामगारांच्या संख्येत वाढ करण्यात यावी व शासनाच्या नियमानुसार त्यांना वेतन देणे. | 10<br>ऑक्टोंबर | 585<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसवकांची नांवआणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 5. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** महापालिकेकडून मनपाची स्वत:ची वास्तु नसल्याने मागील कित्येक वर्षापासून महापालिका वर्धापन दिन निमित्ताची पुजा व त्याचबरोबर अन्य सांस्कृतिक कार्यक्रम हे नियमितपणे विष्णुदास भावे सभागृहात आयोजित करण्याची पध्दत आहे. परंतू सद्यस्थितीत नवी मुंबई महापालिकेने करोडो रुपये खर्च करुन उभारलेल्या व संपुर्ण देशभरात चर्चेचा विषय ठरलेल्या महापालिका मुख्यालय इमारतीचा उद्घाटनाचा सोहळा मोठया जनसमुदायाच्या उपस्थितीत केल्यानंतरही सन 2015 च्या वर्धापन दिन निमित्ताने करण्यात येणारी पुजा व वर्धापन दिन सोहळयाचे आयोजन हे विष्णुदास सभागृहातच करण्यात आले होते. तरी सन 2016 व त्यानंतरच्या प्रत्येक मनपा वर्धापन दिन सोहळयाची पुजा व अन्य कार्यक्रमाचे आयोजन हे महापालिका मुख्यालयाच्या इमारतीत व परिसराच्या आवारात करणे. | 11<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 6. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबईतील दिघा ते पावणे या क्षेत्रात असणा-या विविध कंपन्यामध्ये येणा-या व्यक्तींकडून ठाणे बेलापूर मार्ग हा रस्ता ओलांडण्यासाठी त्या रस्त्याच्या दुभाजकांवर चढण्याचा पर्यंत केला जातो. त्यामुळे अपघात घडून जिवीत तसेच वित्तहानीसह वाहतुक कोंडीचे प्रसंग उद्भवत असल्याने ठाणे बेलापूर मार्गावरील रस्ता दुभाजकांवर लोखंडी कुंपण भिंत उभारणे. | 12<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>लहान मोठया वाहनांची तसेच पादचा-यांची अतिवर्दळ असलेल्या घणसोलीतील तुळशी चौकात नियमित होणारी वाहतुक कोंडी आणि त्यामुळे निर्माण होणारे ध्वनी, वायु प्रदुषणाचा स्थानिक करदात्या नागरीकांना आरोग्याच्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सदरच्या चौकातील वाहतुक बेट व लगतच्या पदपथांचे योग्य आकारमान ठेवून त्या बेट परिसराचे सुशोभिकरण करणे. | 13<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 8. | **श्री. संजू आधार वाड, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 12, से. 2 मधील पावर हाऊस सब स्टेशनच्या बाजूस असलेल्या मोकळया जागेत प्रभागातील महिलांसाठी महिला उद्योग केंद्र उपलब्ध करुन देणे. | 14<br>ऑक्टोंबर | 586<br>17/10/2015 | मंजूर |
| 9. | **श्री. संजू आधार वाड यांजकडून :-**<br>प्र. क्र. 12, से. 2 मधील चौकांतील जे मोकळे भुखंड आहेत त्या भुखंडावर सुशोभिकरण करुन मुलांना खेळण्यासाठी तसेच नागरिकांना बसण्यासाठी बैठक व्यवस्था करणे. | 15<br>ऑक्टोंबर | 587<br>17/10/2015 | मंजूर |
| 10. | **श्री. संजू आधार वाड यांजकडून :-**<br>प्र. क्र. 12, से. 2 मधील परिसरातील रस्त्यांवर स्पीड-बेक्रर ची व्यवस्था करणे. | 16<br>ऑक्टोंबर | 588<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 11. | **श्री. राजेश शिवाजी शिंदे यांजकडून :-**<br>तुर्भे येथील क्षेपनभुमी (डंपींग ग्राऊंड) मुळे परिसरातील नागरीक व लहान मुले मोठया प्रमाणात आजारी पडत आहेत. घाण, दुर्गंधी तसेच किडयांमुळे वेगवेगळे आजार तेथील लोकांना जडत आहे. त्यामुळे तेथील नागरिकांचे जगणे कठिण झाले आहे. त्याकरिता मानवतेच्या दृष्टिकोनातुन विचार करुन तेथील क्षेपनभुमी (डंपींग ग्राऊंड) इतरत्र हलविणे. | 17<br>ऑक्टोंबर | 589<br>17/10/2015 | मंजूर |
| 12. | **श्री. राजेश शिवाजी शिंदे यांजकडून :-**<br>सानपाडा रेल्वे स्टेशन प्रमाणे तुर्भे रेल्वे स्टेशनच्या अंडरपास मधुन लहान वाहनांना ठाणे बेलापुर रोड वरुन APMC मार्केट तसेच वाशी येथे जाण्याकरिता रस्ता उपलब्ध करावे त्यामुळे ठाणे बेलापुर रोडवरील दोन्ही बाजुकडील वाहतुक सुरळीत होईल. | 18<br>ऑक्टोंबर | 590<br>17/10/2015 | मंजूर |
| 13. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव शाळा क्र. 33 मध्ये सन 2015-2016 शैक्षणिक वर्ष पासुन माध्यमिक शाळा इयत्ता 9 वी व 10 वी चे शैक्षणिक वर्ग सुरु करणे. | 19<br>ऑक्टोंबर | 591<br>17/10/2015 | मंजूर |
| 14. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**<br>पावणेगांव येथील एम. एस. ई. बी. च्या विदयुत वाहिन्या जमिनी अंतर्गत करण्याचे काम महानगरपालिके कडून अर्धवट अवस्थेमध्ये काम बंद असुन सदर कामे पुर्ण करुन विदयुत सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देणे. | 20<br>ऑक्टोंबर | 592<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **15.** | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** श्रमिकनगर खैरणे येथील F बिल्डींग खालील महानगरपालिकेच्या मोकळया जागेत तळ मजल्यावर अंगणवाडी, बालवाडीसाठी वर्ग खोली तयार करणे. | 21<br>ऑक्टोंबर | 593<br>17/10/2015 | मंजूर |
| **16.** | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबईतील बहुतांशी रहिवाशी सदया डेंग्यु, मलेरीया, स्वाईन प्लु या सारख्या साथीच्या आजाराने त्रस्त असुन आर्थिक अत्यअल्प घटकातील रहिवाशी यांना खाजगी रुग्णालयात उपचार घेणे म्हणजे त्यांच्या कुटुंबाचे संपुर्ण महिनाभराचे आर्थिक नियोजन कोलमडत आहे. तरी अशा सर्व रुग्णांकरिता प्रशासनाने एक धोरण आखुन नवी मुंबईतील सर्व खाजगी रुग्णालयांना विशेष सवलतीत उपचारार्थ सेवा देणे. | 22<br>ऑक्टोंबर | 594<br>17/10/2015 | मंजूर |
| **17.** | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबई सुनियोजित शहर वसवितांना शासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या बहुमुल्य जमिनी कवडीमोल भावात संपादित केल्या आहेत. नवी मुंबई शहराची वारसा व संस्कृती जोपासताना स्थानिक ब्रास बॅन्ड पथकांनी मौलिक कामगिरी बजावली आहे. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे नवी मुंबईतील गाव गावठाणातील सर्वच बॅन्ड पथके जागेअभावी तग धरु शकत नाहीत. तरी अशा सर्व ब्रास बॅन्ड पथकांना हक्काची सुसज्ज जागा बांधकामासहित प्रशासनाने दयावी. | 23<br>ऑक्टोंबर | 595<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 18. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबई शहराची ओळख ही विशेषत: आगरी कोळी संस्कृतीमुळे ओळखली जाते. नवी मुंबईत सदया मोठ मोठे भवन उभारले जात आहेत. परंतु ज्या वारकरी सांप्रादायाची गोडी आजपर्यंत नियमितपणे अविरत हा समाज जोपासत आहे. त्या वारक-यांचे भवन नवी मुंबईत अस्तित्वात नसल्याची खंत आज सर्वांच्या मना मनात खदखदत आहे. तरी नवी मुंबईतील वारक-यांसाठी एक हक्काचे वारकरी भवन उभारणे. | 24<br>ऑक्टोंबर | 596<br>17/10/2015 | मंजूर |
| 19. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबई सुनियोजित शहर वसवितांना शासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या बहुमुल्य जमिनी कवडीमोल भावात संपादित केल्या आहेत. नवी मुंबई शहराची वारसा व वारकरी परंपरा संस्कृती जोपासताना स्थानिक भजनी मंडळाचे योगदान मौलिक आहे. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे नवी मुंबईतील गाव गावठाणातील सर्वच भजनी मंडळ जागेअभावी तग धरु शकत नाहीत. तरी अशा सर्व भजनी मंडळाना हक्काची सुसज्ज जागा बांधकामासहित प्रशासनाने दयावी. | 25<br>ऑक्टोंबर | 597<br>17/10/2015 | मंजूर |
| 20. | **सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेने नवी मुंबईतील सर्वच तलावांचे तलाव व्हिजन अंतर्गत सुशोभिकरण केले परंतु सानपाडा ग्रामस्थांची अस्मिता असलेला खोकड तलाव आजही सुशोभिकरणा पासुन वंचित आहेत. सानपाडा गावातील ग्रामस्थ आजही आपल्या सर्व विधिवत पुजा अर्चा मुर्ती विसर्जन खोकड तलावात करीत आहेत. तरी सदर तलावाच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर हाती घेणे. | 26<br>ऑक्टोंबर | 598<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 21. | **सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 73, हेकल कंपनी चुनाभटटी विभागात डांबरीकरण रस्ते व गटार तसेच ड्रेनेज व नाल्याची बिलकुल व्यवस्था नाही. परिणामी रहिवाशांना खुप हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. गटार, ड्रेनेज व सांडपाणी वाहून नेणारे नाले नसल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे रहिवाशांना वेगवेगळया आजारांना तोंड दयावे लागते. तरी खालील विभागात डांबरीकरण रस्ते व गटार तसेच ड्रेनेज व नाल्याची अतिशय आवश्यकता आहे. तरी या पुर्ण प्रभागाचा सर्व्हे करुन हेकल कंपनी चुनाभटटी पुजारी टायर जवळ तसेच डी 69 ते डी 73, डी 73/8 ते डी 76/1, डी/73/2 ते डी 77/2, डी 87/1 ते डी 89/2 आणि डी 89/4 च्या समोरील भागात डांबरीकरण रस्ते, गटार व पदपथांची सोय करणे. | 27<br>ऑक्टोंबर | 599<br>17/10/2015 | मंजूर |
| 22. | **सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 73 बोनसरी गाव दुर्गा मंदिर ते बुध्दराज पॅकेजिंग पर्यंतच्या मुख्य नाल्याच्या दगडी भिंतीचे बांधकाम दोन्ही बाजूने पुर्ण तुटले आहे. परिणामी सांडपाणी इतरत्र वाहून पसरते तसेच एकाच ठिकाणी साचुन राहाते. त्याचबरोबर पावसाळयात मोठया प्रमाणात डोंगर उतारावरुन पाणी जोरात वाहून येत असल्याने घरांची खुप हानी होते. या नाल्याच्या दोन्ही बाजूला संरक्षक भिंत बांधणे निकराचे आहे. तरी बोनसरी गाव दुर्गा मंदिर बुध्दराज पॅकेजिंग जवळील मुख्य नाल्याच्या दोन्ही बाजूला संरक्षक भिंत (आर.सी.सी. रिटेनिंग वॉल) बांधणे. | 28<br>ऑक्टोंबर | 600<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **23.** | **सौ. राधा सुरेश कुलकर्णी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 73, इंदिरानगर मुख्यद्वार ते सी 396 पर्यंत असलेल्या सर्व्हिस रोडची खूपच बिकठ परिस्थिती झाली आहे. अर्धा रोड तुटला आहे. अर्ध्या भागात गवत व डेब्रीजने रस्ता खराब झाला आहे. त्यामुळे रस्ते व पदपथांची अवस्था खुपच दयनिय आहे. तरी या पुर्ण प्रभागाचा सर्व्हे करुन इंदिरानगर मुख्य द्वार ते सी 396 पर्यंत परिसर रस्त्यांचे डांबरीकरण करुन रस्ते व पदपथांची पुर्नबांधणी करुन सुशोभित करणे. | 29<br>ऑक्टोंबर | 601<br>17/10/2015 | मंजूर |
| **24.** | **सौ. संगिता वसंत वास्कर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 69, सैनिक प्लायवुड कंपनीसमोरील विभागात तसेच वाल्मीकी घरकूल योजनेसमोरील परिसरात डांबरीकरण रस्ते व गटार तसेच ड्रेनेज व नाल्याची बिलकुल व्यवस्था नाही. परिणामी रहिवाशांना खुप हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. गटार, ड्रेनेज व सांडपाणी वाहून नेणारे नाले नसल्याने पाणी जेथे मोकळा भाग असेल तेथे साचून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. रहिवाशांना नोकरी किंवा उद्योग व्यवसायासाठी या घाणीतून यावे जावे लागतो. त्यामुळे वेगवेगळया आजारांना तोंड दयावे लागते. तरी खालील विभागात रस्ते व गटार तसेच ड्रेनेज व नाल्याची अतिशय आवश्यकता आहे. तरी या पुर्ण प्रभागाचा सर्व्हे करुन प्लॉट नं. डब्यु 462 ते सी 356, सी 358 ते सी 365, सी 371 ते सी 377, सी 513 ते सी 450/4 च्या समोरील परिसरात तसेच प्लॉट नं. सी 121 ते सी 396, सी 311 ते सी 303, सी 462 ते सी 466, सी 470 ते सी 494, सी 311 ते सी 334, सी 533 ते सी 535 आणि सी 535 ते सी 344 च्या समोरील भागात रस्त्यांचे डांबरीकरण करुन रस्ते, गटार व पदपथांची सोय करणे. | 30<br>ऑक्टोंबर | 602<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 25. | **सौ. संगिता वसंत वास्कर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 69, वारलीपाडा, गणपतीपाडा या परिसरात दिवाबत्तीची सोय नसल्याने नागरिकांच्या सुरक्षा व्यवस्थेचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, अंधाराचा फायदा महिलांना छेडणे त्यांच्या गळयातील मंगळसुत्र चोरणे इ. प्रकार घडू लागले आहेत. चोरांचा सुळसुळाट झाला आहे. चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. तरी लवकरात लवकर वारलीपाडा, गणपतीपाडा या परिसरात दिवाबत्तीची सोय करणे. | 31<br>ऑक्टोंबर | 603<br>17/10/2015 | मंजूर |
| 26. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>रा. फ. नाईक शाळा येथे सेक्टरच्या बाजुकडून स्कायवॉक अथवा अंडर सब बनविण्यात यावा जेणेकरुन शाळेतील मुलांना रस्ता क्रॉस करणे सोयीचे होईल त्याठिकाणी छोटे मोठे अपघात होतात तरी निर्णय व्हावे. | 32<br>ऑक्टोंबर | 604<br>17/10/2015 | मंजूर |
| 27. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>रा. फ. नाईक चौक येथे रस्ता क्रॉस करणे खूप अवघड आहे या ठिकाणी सतत अपघात होतात. त्यामुळे त्या ठिकाणी चार बाजु स्काय वॉक व्हावा किंवा अंडर सबवे व्हावा. | 33<br>ऑक्टोंबर | 605<br>17/10/2015 | मंजूर |
| 28. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>सेक्टर 12 डी रामनगर येथील गटारांची कामे करुन फुटपाथ ब्लॉक लावून सुशोभित करणे. | 34<br>ऑक्टोंबर | 606<br>17/10/2015 | मंजूर |
| 29. | **श्री. अशोक बाबुराव गुरख, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर 1 विभागातील लेन 4 येथील पावसाळी गटरची दुरुस्ती करुन नागरिकांना सुसज्ज असे पदपथ बनविण्यात | 35<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 30. | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर 2 विभागातील गणेश मंदीरापासुन ते युएचपी पर्यंत पदपथाचे नुतनीकरण करणे. | 36<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **31.** | **श्री. अशोक बाबुराव गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सेक्टर 1 विभागातील गावस्कर मैदाना बाहेरील पदपथाची दुरुस्ती करुन नागरीकांना सुसज्ज असे पदपथ बनविणे. | 37<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **32.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मधील शिरवणे शाळेजवळील नादुरुस्त पदपथ चांगल्या पध्दतीने दुरुस्त करणे. | 38<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **33.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मधील उदयानाची दुरुस्ती करणेबाबत तसेच उदयानांमध्ये मुलांना खेळण्यासाठी खेळण्यांची योग्य ती सुविधा उपलब्ध करणे. | 39<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **34.** | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मधील स्मशानभुमी समोरील जे नाले उघडे आहेत त्या नाल्यांवर आधुनिक पध्दतीने स्लॅप व पदपथ तयार करण्यात | 40<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **35.** | **श्री. विशाल पोपट ससाण, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मधील सेक्टर 24 व 25 परिसरातील गटारांवर FRB कव्हर्स बसविणे | 41<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **36.** | **श्री. विशाल पोपट ससाण, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन मध्ये सुशोभिकरण करण्यात यावे तसेच मुलांना खेळण्यासाठी योग्य त्या सुविधा उपलब्ध करणे. | 42<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| **37.** | **श्री. विशाल पोपट ससाण, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मधील जुईनगर स्टेशन ते राजीव गांधी ब्रिज पर्यंत असलेल्या नादुरुस्त पदपथाचे दुरुस्तीकरण करणे | 43<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसवकांची नांवआणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 38. | **श्री. सुरश शिवाजी कुलकर्णी, यांजकडून :-** प्र. क्र. 68, 69, 70 व 73 तुर्भे स्टोअर ठाणे बेलापूर रोड येथील प्रभागातील नागरीकांना जीम नसल्याने ते वाशी येथे व्यायाम करण्यासाठी जातात. त्यामुळे नागरिकांना मोठया प्रमाणात अडचणी येतात. त्या अनुषंगाने प्रभागातील युवक व नागरिकांनी मोठया प्रमाणात जीमची मागणी केली आहे. या प्रभागात नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 22 व 23 येथील मोकळया जागेत ओपन जीम तयार करावी जेणेकरुन नागरिकांना आरोग्य विषयक तक्रारी दुर होतील. तरी सदर ठिकाणी तात्काळ ओपन जीम करुन मिळणे. | 44<br>ऑक्टोंबर | 607<br>17/10/2015 | मंजूर |
| 39. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्र. क्र. 1 मधील ईश्वरनगर विभागात वाढती लोकसंख्या व नियोजीत असणा-या चाळीमध्ये सेवरेज लाईन टाकणे. | 45<br>ऑक्टोंबर | 608<br>17/10/2015 | मंजूर |
| 40. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्र. क्र. 1, ईश्वरनगर येथे मन्नुभाई चाळी समोरील मोकळया जागेत जी+2 चे नवीन शौचालय बांधण्यात यावे. सदर परिसरातील लोकांना शौचालयाकरिता रेल्वे ट्रॅक तसेच इतर ठिकाणी उघडयावर बसावे लागत असल्याने सदर शौचालय बांधल्यास नागरिकांची गैरसोय होणार नाही. | 46<br>ऑक्टोंबर | 609<br>17/10/2015 | मंजूर |
| 41. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्र. क्र. 1, ईश्वरनगर येथील परिसरात पोलची संख्या अपुरी आहे. तरी सदर परिसरात 4 ते 5 हायमास्ट बसविणे. | 47<br>ऑक्टोंबर | 610<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसवेकांची नांवआणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 42. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 79, संत शिरोमणी तुकाराम महाराज उदयान सेक्टर 7, सानपाडा जैन मंदिराच्या मागे महिला सक्षमीकरण केंद्र उभारणे. | 48<br>ऑक्टोंबर | 611<br>17/10/2015 | मंजूर |
| 43. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 79, सानपाडा सेक्टर 7, ऐश्वर्या सोसायटी ते डी-मार्ट व सेक्टर 11 रोडच्या मध्ये पॅरोबॉलीक कब स्टोन लावणे. | 49<br>ऑक्टोंबर | 612<br>17/10/2015 | मंजूर |
| 44. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 79, झाशीची राणी मैदान, सेक्टर 9, सानपाडा येथे सिझन क्रिकेट सराव करणा-या मुलांची निवड Under 14 मुंबई टीम मध्ये झालेली आहे. व Under 19 मध्येही निवड झालेली आहे. हया स्थानिक खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी मैदानात पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देण्यात यावे तसेच Changing room ची व्यवस्था करणे. | 50<br>ऑक्टोंबर | 613<br>17/10/2015 | मंजूर |
| 45. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर -16, 16ए व 18 येथे शालेय विदयार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने विदयार्थी व त्यांच्या पालकांना भर पावसात व उन्हात बसेससाठी उभे रहावे लागते. त्याची गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक तेथे बस थांबा (निवारा शेड) उभारणे. | 51<br>ऑक्टोंबर | 614<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 46. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर -16 येथील संभाजी राजे उदयानातील जुन्या खेळण्याची दुरावस्था मोठया प्रमाणात झाली असुन सदर ठिकाणी नवीन सुंदर आकर्षक खेळणी बसविणे. | 52<br>ऑक्टोंबर | 615<br>17/10/2015 | मंजूर |
| 47. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर -16ए येथील स्व. मिनाताई ठाकरे मैदानाजवळ विविध धर्मांचे उत्सव व कार्यक्रम वर्षेभर साजरे होत असतात. परंतु सदर ठिकाणी अपु-या प्रकाशामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. म्हणुन त्या ठिकाणी हायमास्ट बसविणे. | 53<br>ऑक्टोंबर | 616<br>17/10/2015 | मंजूर |
| 48. | **सौ. सलुजा संदिप सुतार, यांजकडून :-** प्र. क्र. 99, नेरुळ, सेक्टर -25 मधील राखीव भुखंडावर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक असे कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरिता सर्वसामान्यासाठी बहुउददेशीय सभागृह उभारणे. | 54<br>ऑक्टोंबर | 617<br>17/10/2015 | मंजूर |
| 49. | **सौ. सलुजा संदिप सुतार, यांजकडून :-** प्र. क्र. 99, नेरुळ, सेक्टर -25 व 27 येथील नाल्यालगत असलेल्या नर्सरी मधील अनधिकृत खडडे, वाढलेले गवत, तसेच तेथील अस्वच्छतेंमुळे रोगराईचे प्रमाण वाढत असून त्याचा त्रास तेथे राहणाऱ्या नागरिकांना होत असल्यामुळे हायटेन्शनच्या खालील जागा सिडको कडून महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेण्यात याव्यात व त्या ठिकाणी नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक, तसेच गार्डन बांधणे. | 55<br>ऑक्टोंबर | 618<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसवेकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 50. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-** महाराष्ट्र शासनाने दि. 04/02/2015 रोजी मंजूर केलेल्या अधिसूचना क्र. टिपीबी-4312/643/प्र.क्र.-9/1/2014/नवि-11 नुसार बरीचशी स्वस्त दराची घरे निर्माण होणार आहेत. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात सर्व सुविधा महापालिका पुरविते. अधिसूचनेत नमूद केल्याप्रमाणे जो विकासक इमारतींची पुर्नबांधणी करणार त्याने 50% सदनिका महापालिकेला हस्तांतरीत करावयाची आहेत. त्यातील काही सदनिका नवी मुंबई पोलीस, नवी मुंबईतील पत्रकार व फायर ब्रिगेड कर्मचारीकरिता राखून ठेवावी, असा ठराव मांडून शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे. | 56<br>ऑक्टोंबर | 619<br>17/10/2015 | मंजूर |
| 51. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-** महाराष्ट्र शासनाने दि. 04/02/2015 रोजी मंजूर केलेल्या अधिसूचना क्र. टिपीबी-4312/643/प्र.क्र.-9/1/2014/नवि-11 नुसार सिडकोनिर्मित इमारतींना 2.5 चटईक्षेत्र मंजूर करण्यात आले आहे. वाशी वगळता नवी मुंबईमध्ये इतर कोणत्याही ठिकाणी विक्रीदर कमी असल्याने इमारतींची पुर्नबांधणी करणे विकासकास आर्थिक दृष्टया शक्य नाही. म्हणुन अशा ठिकाणी 3 चटईक्षेत्र मंजूर करण्याबाबतचा ठराव मांडून शासनाकडे मंजूरीसाठी पाठविणे. | 57<br>ऑक्टोंबर | 620<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसवकांची नांवआणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 52. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-**<br>महाराष्ट्र शासनाने दि. 04/02/2015 रोजी मंजूर केलेल्या अधिसूचना क्र. टिपीबी-4312/643/प्र.क्र.-9/1/2014/नवि-11 मध्ये नमूद केल्याप्रमाणे खाजगी गृहनिर्माण संस्थांना 2.5 चटईक्षेत्राचा लाभ घेता येणार नाही. परिणामी ब-याच मोडकळीस आलेल्या खाजगी गृहनिर्माण संस्थांचे पुर्नवसन होणार नाही. तरी 2.5 ते 3 चटईक्षेत्राचा खाजगी गृहनिर्माण संस्थांना लाभ मिळावा असा ठराव मांडून शासनाकडे पाठविणे. | 58<br>ऑक्टोंबर | 621<br>17/10/2015 | मंजूर |
| 53. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 30 मधील तळवली सिंधुदुर्ग वसाहत येथील शौचालयाचे, पदपथाचे नव्याने बांधकाम व तुकाराम सदन समोरील शौचालयाची दुरुस्ती करणे. | 59<br>ऑक्टोंबर | 622<br>17/10/2015 | मंजूर |
| 54. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 30 मधील सेक्टर 16 भुखंड क्र. 1, भुमीराज सोसायटी व खाडी किनारा या मधील जागेची सिडकोकडे मागणी करुन सदर जागेत उदयान व जेष्ठांसाठी विरंगुळा केंद्र करणे. | 60<br>ऑक्टोंबर | 623<br>17/10/2015 | मंजूर |
| 55. | **सौ. सायली नारायण शिंद, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 37 अंतर्गत येणा-या टिंबर मार्केट, सेक्टर 1 मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे. | 61<br>ऑक्टोंबर | 624<br>17/10/2015 | मंजूर |
| 56. | **सौ. सायली नारायण शिंद, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 37 अंतर्गत येणारे खोली क्र. 224 ते खोली क्र. 245 पाठीमागील म्हणजेच विठठल-रखुमाई मंदिरा लगतच्या मोकळया जागेत पेवर ब्लॉक बसविणे. | 62<br>ऑक्टोंबर | 625<br>17/10/2015 | मंजूर |
| 57. | **सौ. नंदा कुंदन काट, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 13, ऐरोली येथे तरुणांना व्यायाम करण्याकरिता व्यायामशाळा बांधणे. | 63<br>ऑक्टोंबर | 626<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **58.** | **सौ. नंदा कुंदन काटे, यांजकडून :-** प्र. क्र. 13, ऐरोली येथील बसस्थानकांत सातत्याने पावसाळयामध्ये पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नसल्याने तलावाची परिस्थिती होते. याकरिता अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात यावे जेणेकरुन पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल. | 64<br>ऑक्टोंबर | 627<br>17/10/2015 | मंजूर |
| **59.** | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपटटी भागात झोपडीधारकांना घरगुती नळ कनेक्शनबाबत लागणारे सन 1999 चे एक पुरावा पैकी एक पुरावा असल्यास नळ कनेक्शन देणे. | 65<br>ऑक्टोंबर | 628<br>17/10/2015 | मंजूर |
| **60.** | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपटटी भागातील झोपडपटटी धारकांना घरगुती नळकनेक्शनबाबत व ग्रुप नळ कनेक्शन करिता प्रत्येक विभाग कार्यालयात "एक खिडकी योजना" राबविणे. | 66<br>ऑक्टोंबर | 629<br>17/10/2015 | मंजूर |
| **61.** | **श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-** डेंग्युबाबत जनजागृती (डेंग्यु व मलेरियाबाबत) करिता झोपडपटटी भागात बॅनर व योग्य उपाययोजना तसेच रक्त चाचणी व डेंग्युचे औषध प्रत्येक "नागरी आरोग्य केंद्र" सुविधा पुरविणे. | 67<br>ऑक्टोंबर | 630<br>17/10/2015 | मंजूर |
| **62.** | **सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-** प्र. क्र. 94, सेक्टर-10 येथील कै. अण्णासाहेब पाटील घरमालक संघटना, सेक्टर-10, चाळ नं. 1 ते 14 या ठिकाणी प्रवेशद्वार (कमानी) उभारणे. | 68<br>ऑक्टोंबर | 631<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 63. | **सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 94, सेक्टर-10, नेरुळ येथील कै. आण्णासाहेब पाटील उदयानामध्ये कै. अण्णासाहेब पाटील यांचे भव्य स्मारक उभारणे. | 69<br>ऑक्टोंबर | 632<br>17/10/2015 | मंजूर |
| 64. | **सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 94, सेक्टर-10, नेरुळ येथील षटकार आनेर्स असोसिएशन मधील चाळ नं. 12 ते 26 या ठिकाणी मोकळया जागेमध्ये व पदपथावर पेव्हर ब्लॉक बसविणे. | 70<br>ऑक्टोंबर | 633<br>17/10/2015 | मंजूर |
| 65. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 26, अडवली-भुतवली येथे श्री. हरिश्चंद्र रुपजी खुलात चाळ ते श्रीमती हावलीबाई वरठे चाळ येथे गटार उघडे आहे. गटार उघडे असल्यामुळे नागरिक त्यामध्ये विविध प्रकारचा कचरा टाकतात. त्यामुळे तेथे अत्यंत दुर्गंधी होते. त्यामुळे तेथील राहणा-या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी सदर गटार बंदिस्त करणे. | 71<br>ऑक्टोंबर | 634<br>17/10/2015 | मंजूर |
| 66. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 26, अडवली-भुतवली येथे श्री. संजय घाटाळ ते गंगाराम घाटाळ यांच्या घरापासून ते स्मशानभुमी पर्यंत रस्ता बांधणे. | 72<br>ऑक्टोंबर | 635<br>17/10/2015 | मंजूर |
| 67. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 26, हनुमाननगर येथील महानगरपालिका शाळेजवळ एक हायमास्ट लावणे. | 73<br>ऑक्टोंबर | 636<br>17/10/2015 | मंजूर |
| 68. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>आरोग्य केंद्र उभारणी करीता एकुण 50000 लोकसंख्येची अट शिथिल करुन 25000 लोकसंख्येगणिक एक आरोग्य केंद्र उभारणे. | 74<br>ऑक्टोंबर | 637<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 69. | **श्री. सुरज बाळाराम पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका राबवित असलेल्या योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचण्याकरीता तसेच त्याचा फायदा प्रत्येक नवी मुंबईकराला मिळण्याकरिता नियोजनबध्द जाहिरात करणे. | 75 / ऑक्टोंबर | 638 / 17/10/2015 | मंजूर |
| 70. | **सौ. संगीता दिलीप बो-हाड, यांजकडून :-** प्र. क्र. 76, सानपाडा, सेक्टर 2 येथील मैदानाच्या कोप-यावर (चिंचोळा कोपरा) वात्सल्य ट्रस्टच्या मागे कुस्तीगीरांच्या सरावासाठी व्यायामशाळा बांधणे. | 76 / ऑक्टोंबर | 639 / 17/10/2015 | मंजूर |
| 71. | **सौ. संगीता दिलीप बो-हाड, यांजकडून :-** प्र. क्र. 76, सानपाडा, सेक्टर 2 येथील मैदानाच्या बाजूला वात्सल्य ट्रस्ट ही सेवाभावी संस्था कित्येक वर्षे काम करीत असून सदर मैदानाचे वात्सल्य मैदान नामकरण करण्यात | 77 / ऑक्टोंबर | 17/10/2015 | मागे घेतला |
| 72. | **सौ. संगीता दिलीप बो-हाड, यांजकडून :-** प्र. क्र. 76, सानपाडा, सेक्टर 4 येथील मार्केट मधील संरक्षण भिंत व शौचालय दुरुस्ती करणे. | 78 / ऑक्टोंबर | 641 / 17/10/2015 | मंजूर |
| 73. | **सौ. दिपाली सुरक्षा संकपाळ, यांजकडून :-** प्र. क्र. 35, घणसोली, सेक्टर-7 येथील सिम्पलेक्स वसाहतीच्या बाहेरील विविध पदपथांवर व सेक्टर -9, भगवती, त्रिशुल, भुमी, गगनगिरी या सर्व सोसायटीच्या बाहेर पेव्हर ब्लॉक बसवुन नवीन सुधारणा करणे. | 79 / ऑक्टोंबर | 642 / 17/10/2015 | मंजूर |
| 74. | **सौ. दिपाली सुरक्षा संकपाळ, यांजकडून :-** प्र. क्र. 35, घणसोली, सेक्टर-9, घरोंदा वसाहती मधील ड्रेनेज लाईन खराब झाल्या असुन नवीन ड्रेनेज लाईन करणे. | 80 / ऑक्टोंबर | 643 / 17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 75. | **सौ. दिपाली सुरक्ष संकपाळ, यांजकडून :-** प्र. क्र. 35, घणसोली, घरोंदा व सिम्पलेक्स वसाहतीमध्ये पाण्याची लाईन जुनी असल्यामुळे पाणी कमी दाबाने येते म्हणुन येथील जुन्या पाण्याच्या पाईन लाईन GI लाईनमध्ये बदल करणे. | 81<br>ऑक्टोंबर | 644<br>17/10/2015 | मंजूर |
| 76. | **सौ. सुवर्णा प्रशांत पाटील, यांजकडून :-** तलाव व्हिजन द्वारे तलावांचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. तशा पध्दतीचे वार्ड क्र. 36, घणसोली येथील ग्रामपंचायत कालिन सावली तलावाचे साफसफाई करुन सुशोभिकरण करणे. | 82<br>ऑक्टोंबर | 645<br>17/10/2015 | मंजूर |
| 77. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्र. क्र. 45 मधील से. 7, 6 व 3 सर्व पावसाळी हेवी डयुटी गटारे दुरुस्ती करणे. | 83<br>ऑक्टोंबर | 646<br>17/10/2015 | मंजूर |
| 78. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्र. क्र. 45 मधील से. 7, 6 व 3 मध्ये नवीन हायमास्ट दिवे बसविणे. | 84<br>ऑक्टोंबर | 647<br>17/10/2015 | मंजूर |
| 79. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्र. क्र. 45 मधील से. 7, 6 व 3 येथील सर्व चौकांचे सुशोभिकरण तसेच प्रभागातील सर्व रिक्षा व टॅक्सी स्टँड यांचे सुशोभिकरण करणे. | 85<br>ऑक्टोंबर | 648<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 80. | **श्री. लिलाधर गणपत नाईक, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 50, बोनकोडे गांव येथील नागरिकांना भाजी खरेदीसाठी भाजी मंडईची व्यवस्था नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यासाठी प्रभागातील शिवाजीनगर येथे पाण्यांच्या टाकीजवळ मोकळा भुखंड आहे त्या मोकळया भुखंडाचा काही भाग भाजी मंडईसाठी उपलब्ध करुन दयावा जेणेकरुन नागरिकांची गैरसोय दुर होईल. तसेच भाजीमंडईच्या भाडयातून पालिकेस उत्पन्न मिळेल. | 86<br>ऑक्टोंबर | 649<br>17/10/2015 | मंजूर |
| 81. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>सी.बी.डी., सेक्टर 8, 8ए व बी या क्षेत्रालगत असलेल्या 35 फुट रुंदीच्या उघडया पावसाळी नाल्यात डोंगर उतारावरुन वाहून येणा-या दगड माती तसेच जंगलातील पाला पाचोळा, लहान मोठी झाडे असा साचणारा कचरा काढण्यासाठी तसेच त्या नाल्याची व नाल्याच्या भिंतीची नियमितपणे दुरुस्ती देखभाल करण्यासाठी नाल्याच्या पुर्वोत्तर दिशेकडील बाजूस कायमस्वरुपी रॅम्प बसविणे. | 87<br>ऑक्टोंबर | 650<br>17/10/2015 | मंजूर |
| 82. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>आर्टीस्ट व्हिलेज, सेक्टर 8 मध्ये सदनिकाधारकांना दुचाकी, हलकी चार चाकी वाहने उभी करण्याच्या समस्येस सामोरे जावे लागत असल्याने आर्टीस्ट व्हिलेज मधील रस्ते आणि पदपथ यांच्या लगत असलेल्या खुल्या मोकळया जागांचे सपाटीकरण करुन कंडोमिनियम निहाय वाहनतळ बनविण्याची तरतुद करणे. | 88<br>ऑक्टोंबर | 651<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 83. | **सौ. सुरखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 103 मधील जय दुर्गामातानगर ही नागरी वसाहत छत्रपती संभाजीनगरसह सेक्टर 8बी या सिडको विकसित वसाहतीला रस्त्याच्या माध्यमातून जोडण्यासाठी दुर्गामातानगर ते संभाजीनगराच्या दिशेने रस्त्याची उभारणी करणे. | 89<br>ऑक्टोंबर | 652<br>17/10/2015 | मंजूर |
| 84. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 53, नोड-1, जुहुगांव येथील झेडपी रोडची फार दुरावस्था झाली आहे. त्या रोडचे डांबरीकरण करणे. | 90<br>ऑक्टोंबर | 653<br>17/10/2015 | मंजूर |
| 85. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 53, जुहुगांव येथील होल्डिंग पॉन्ड किनारी जॉगिंग ट्रॅकवर आसन व्यवस्था करुन त्यावर शेड बांधणे. | 91<br>ऑक्टोंबर | 654<br>17/10/2015 | मंजूर |
| 86. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 53, नोड 1, जुहुगांव से. 12 प्लॉट नं. 78 येथील नव्याने विकसित केलेल्या उदयानामध्ये फुटपाथ, आसन व्यवस्था, संरक्षण भिंत आणि पथदिव्यांची व्यवस्था करणे. | 92<br>ऑक्टोंबर | 655<br>17/10/2015 | मंजूर |
| 87. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, जुईनगरच्या अंतर्गत असलेल्या जुईपाडा गावात जाण्यासाठी चार रस्ते आहेत ते नादुरुस्त स्थितीत आहेत. ठिकठिकाणी पावसाचे पाणी साठते व नागरिकांना येता-जाता त्रास होतो. तरी नागरिकांच्या सोयीसाठी सदर चारही रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 93<br>ऑक्टोंबर | 656<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 88. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, जुईनगर येथे गावदेवी मैदानालगत प्रकाश मेडीकल समोरील भागात तसेच हरीओम मंदिराजवळील नवरात्र चौकासमोरील भागात वाचनालयासाठी शेड बांधणे. | 94<br>ऑक्टोंबर | 657<br>17/10/2015 | मंजूर |
| 89. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, जुईनगर, सेक्टर 23 येथील मुख्य रस्त्यालगत असलेल्या फुटपाथला ग्रीलचे संरक्षण नसल्यामुळे फुटपाथवर विक्रेते बसतात व पादचा-यांना त्रास होतो. तरी मुख्य रस्त्यालगत असलेल्या फुटपाथच्या बाजुला ग्रील लावुन सदर सर्व फुटपाथ विक्रेतामुक्त करणे. | 95<br>ऑक्टोंबर | 658<br>17/10/2015 | मंजूर |
| 90. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 80, शिवाजीनगर येथील नवी मुंबई महानगरपालिकेची असलेली विदयुत पथ दिव्यांचे खांब फार जुनी आहेत. ते वारंवार दुरुस्त करुन सुध्दा मोडकळ अवस्थेत आहेत. प्रभागातील पथ दिव्यांचे खांब नवीन उभारणे. | 96<br>ऑक्टोंबर | 659<br>17/10/2015 | मंजूर |
| 91. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 80 मधील महात्मा गांधीनगर परिसरात घरावर विदयुत वाहिन्या आहेत. तेथील घरे डोंगराच्या शेजारी असल्यामुळे येथे वारा जोराने वाहत असतो. येथील घरावरुन गेलेल्या विदयुत वाहिन्या हवेने हलत असतात. हया विदयुत वाहिन्या घरावर पडल्यास येथे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील विदयुत वाहिन्या भुमिगत करणे. | 97<br>ऑक्टोंबर | 660<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 92. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे यांजकडून :-** प्र. क्र. 80 मधील औदयोगिक परिसरामध्ये एकही सुलभ शौचालय नसल्यामुळे औदयोगिक परिसरामधील येणारे व जाणारे नागरिकाची शौचालयाबाबत गैरसोय होत आहे. त्यांच्या सुविधेकरीता विविध ठिकाणी ई-टॉयलेट व सुलभ शौचालय उभारणे. | 98<br>ऑक्टोंबर | 661<br>17/10/2015 | मंजूर |
| 93. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 85, कुकशेत गांव व सारसोळे गांव (काही भाग) व सेक्टर-6 येथील नामफलकांची झालेली दुरावस्था सुधारणा करणे. | 99<br>ऑक्टोंबर | 662<br>17/10/2015 | मंजूर |
| 94. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 85, ॲकरोपोलिस सोसायटी समोरील जय बालाजी सोसायटी समोरील गटार फुटपाथची सुधारणा करणे. | 100<br>ऑक्टोंबर | 663<br>17/10/2015 | मंजूर |
| 95. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 85, सारसोळेगांव श्री. रमण म्हात्रे/श्री. मदन म्हात्रे यांच्या घरापासुन श्री. नितीन म्हात्रे/श्री. कैलास म्हात्रे यांच्या घराकडील ग्रामस्थांकरीता मोठया व्यासाची जलवाहिनी टाकणे. | 101<br>ऑक्टोंबर | 664<br>17/10/2015 | मंजूर |
| 96. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्र. क्र. 86, सारसोळे गांव व सेक्टर-6 परिसरातील नामफलकांची झालेली दुरावस्था सुधारणा करणे. | 102<br>ऑक्टोंबर | 665<br>17/10/2015 | मंजूर |
| 97. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्र. क्र. 86, नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेला प्रवेशद्वार बांधणे. | 103<br>ऑक्टोंबर | 666<br>17/10/2015 | मंजूर |
| 98. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-** प्र. क्र. 86, सारसोळे गांव, सेक्टर-6 मधील गटारे नियोजनबध्द अतिरिक्त यंत्रणा लावुन साफ करणे. | 104<br>ऑक्टोंबर | 667<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 99. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्र. क्र. 97 मध्ये सेक्टर 18अे मध्ये शिवमंदिर रोडच्या दोन्ही बाजूच्या फुटपाथची अवस्था दयनीय झाली असून तरी त्या ठिकाणी नवीन फुटपाथ करण्यात यावी. ती लो लेवल करणे. | 105<br>ऑक्टोंबर | 668<br>17/10/2015 | मंजूर |
| 100. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्र. क्र. 97 मध्ये सेक्टर 24 च्या मागील बाजूस असलेल्या मैदानाला संरक्षण भिंत बांधणे. | 106<br>ऑक्टोंबर | 669<br>17/10/2015 | मंजूर |
| 101. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्र. क्र. 97 मध्ये सेक्टर 18अे मध्ये तलावाच्या बाजूच्या गार्डनमध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र सर्व सुखसुविधांनी युक्त उभारणे. | 107<br>ऑक्टोंबर | 670<br>17/10/2015 | मंजूर |
| 102. | **श्री. लक्ष्मीकांत नामदव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27 अंतर्गत परिसरातील तरुणांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व शरीर निरोगी राहण्यासाठी व्यायामशाळा सुरु करणे. | 108<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 103. | **श्री. लक्ष्मीकांत नामदव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27 विदयार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी आणि त्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होण्यासाठी अदयावत असे वाचनालय सुरु करणे. | 109<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 104. | **श्री. लक्ष्मीकांत नामदव पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 27 अंतर्गत संपुर्ण प्रभागामध्ये असलेल्या मल:निस्सारण वाहिन्या या अपु-या पडत आहेत. त्यामुळे वारंवार चोकअप होणे असे प्रकार होत आहेत. याकरीता सदयस्थितीतील लोकसंख्येच्या मानाने मोठया व्यासाच्या मल:निस्सारण वाहिन्या टाकणे. | 110<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 105. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील :-** प्रभाग क्र. 28, घणसोली येथे जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. | 111<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 106. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील :-** प्रभाग क्र. 28 अंतर्गत अदययावत असे वाचनालय बांधणे. | 112<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 107. | **सौ. सुनिता रतन मांडवे यांजकडून :-**<br>प्र. क्र. 87, नेरुळ विभागातील सेक्टर 8 राजर्षी छत्रपती शाहू महाराज उदयानात जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्राची उभारणी करण्यात तसेच व्यायामाची साधनांची तरतूद करणे. | 113<br>ऑक्टोंबर | 671<br>17/10/2015 | मंजूर |
| 108. | **सौ. सुनिता रतन मांडवे यांजकडून :-**<br>प्र. क्र. 87, नेरुळ विभागातील जुन्या पदपथांच्या खाली असलेल्या गटारांची पुर्नबांधणी करण्यात आल्यानंतर सदरील पदपथांच्या जागांवरुन आबाल वृध्दांना चालणे गैरसोईचे व धोकादायक ठरत आहे. त्यामुळे या क्षेत्रात नव्याने बांधण्यात आलेल्या गटारांवरील असमतोल पृष्ठभागांवर पेव्हर्स लावून पदपथांची उभारणी करणे. | 114<br>ऑक्टोंबर | 672<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 109. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 56, कोपरी उडडाणपुलाखालील रस्त्यापासून ते पुनित कॉर्नर पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | 115 / ऑक्टोंबर | 673 / 17/10/2015 | मंजूर |
| 110. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 56, कोपरीगांव, जुन्या स्मशानभुमी शेजारी बहुउददेशिय इमारत बांधणे. | 116 / ऑक्टोंबर | 674 / 17/10/2015 | मंजूर |
| 111. | **सौ. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 56, कोपरीगांव, जलवाहिन्यांची सुधारणा करणे. | 117 / ऑक्टोंबर | 675 / 17/10/2015 | मंजूर |
| 112. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-** प्र. क्र. 111 मधील सेक्टर 46 मधील क्रांतिसिंह नाना पाटील उदयानाची दुरावस्था झाली असून उदयान ठिकठिकाणी नादुरुस्त झाले आहे. तसेच उदयानात बसण्यासाठी ठेवलेले बाकडे तुटलेले आहेत आणि रात्रीच्या वेळी त्याठिकाणी आंधार होत असल्याकारणाने अंधारीमध्ये गर्दुले, गांजा, दारु पिण्यासाठी उदयानाचा उपयोग करत आहेत. त्याचा त्रास तेथील रहिवाशांना होत आहे. तरी सदर उदयानाची दुरुस्ती करुन उदयानामध्ये लहान मुलांना खेळण्यासाठी नवीन खेळणी बसविण्यात यावी व त्याठिकाणी चांगल्या प्रकाशाचे दिवे बसविणे. | 118 / ऑक्टोंबर | 676 / 17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 113. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे यांजकडून :-**<br>प्र. क्र. 111 मध्ये सेक्टर 46ए मधील नवी मुंबई महानगरपालिकेच्या खेळाच्या मैदाना शेजारी चौकात संध्याकाळी अंधार होण्याच्या वेळेस बरेच नागरिक चालण्यासाठी येत असतात. तसेच मैदानामध्ये देखील मुले खेळत असतात त्याठिकाणी हायमास्ट दिवे बसविण्यास त्याठिकाणी महिला तसेच जेष्ठ नागरिक यांना वॉक करताना त्रास होणार नाही. तरी त्याठिकाणी हायमास्ट दिवे बसविणे. | 119<br>ऑक्टोंबर | 677<br>17/10/2015 | मंजूर |
| 114. | **श्री. गणेश गंगाराम म्हात्रे यांजकडून :-**<br>प्र. क्र. 111 मध्ये सेक्टर 58ए मधील रस्ते खराब झाले असून मागील वर्षात फक्त एन.आर.आय. कॉम्पलेक्स पर्यंत नवीन डांबरीकरण केले होते. सेक्टर 58ए चा भाग तसाच राहील्यामुळे तेथील रस्ते खराब झाले आहेत. तसेच फुटपाथ वरील सिडकोने बसविलेले जुने पेवर ब्लॉक खराब झाले असून पावसाळयात त्यावर मोठया प्रमाणात गवत उगवत आहे व गटारावरील झाकणे देखील खराब झालेली आहेत. तरी सेक्टर 58ए मधील रस्त्याचे डांबरीकरण करुन फुटपाथ वर नवीन चांगल्या प्रकारचे पेवर ब्लॉक बसवावेत व गटारावरील झाकणे बदलून एफ.आर.पी. झाकणे बसविणे. | 120<br>ऑक्टोंबर | 678<br>17/10/2015 | मंजूर |
| 115. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे यांजकडून :-**<br>प्र. क्र. 95, गोपीनाथ भिवा पाटील यांच्या घरांपासून ते राजेश पांडुरंग म्हात्रे यांच्या घरापर्यंत नव्याने गटार बनवुन पदपथावर पेव्हर ब्लॉक बसविणे. | 121<br>ऑक्टोंबर | 679<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 116. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे यांजकडून :-** प्र. क्र. 95, तेरणा शाळेपासूनचा रस्ता दोन पदरी असून नेरुळ गांव गावदेवी मंदिराकडे जाताना तो एक पदरी होतो. तरी रस्त्याच्या कडेला असणा-या स्थानिक ग्रामस्थांचे अन्य ठिकाणी पुर्नवसन करुन सदरचा रस्ता दोन पदरी करणे. | 122 ऑक्टोंबर | 680 17/10/2015 | मंजूर |
| 117. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे यांजकडून :-** प्र. क्र. 95, रामा हशा म्हात्रे यांच्या घरापासून ते मुकेश गोपीनाथ पाटील यांच्या घरापर्यंत गटाराची दुरुस्ती करुन पदपथावर नविन पेव्हर ब्लॉक बसविणे. | 123 ऑक्टोंबर | 681 17/10/2015 | मंजूर |
| 118. | **ॲड सौ. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 44, कोपरखैरणे, से. नं. 7 येथील सदनिका क्र. एस.एस.1/969 च्या समोरील मोकळया जागेमध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र करणे. | 124 ऑक्टोंबर | 682 17/10/2015 | मंजूर |
| 119. | **ॲड सौ. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 44, कोपरखैरणे, से. नं. 7 येथील मंजुश्री को. ऑप. हौ. सोसायटी प्लॉट नं. 21 च्या बाजुचे रहदारीसाठी असणारे गटर हेवी डयुटी करणे. | 125 ऑक्टोंबर | 683 17/10/2015 | मंजूर |
| 120. | **ॲड सौ. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 44, से. नं. 15, कोपरखैरणे येथील कै. शिवाजीराव पाटील मैदान मधील शौचालय निकृष्ठ दर्जाचे झाले असुन त्यांचे नव्याने बांधकाम करणे. | 126 ऑक्टोंबर | 684 17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 122. | **श्री. रामचंद्र बारशा घरत, यांजकडून :-** प्र. क्र. 66, तुर्भेगांव मधील रामतनु मैदान से. 22 लगतच्या व्यायामशाळेची इमारत मोडकळीस आली आहे. त्यामुळे जीवीतहानी व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर इमारत पाडून पालिकेकडून नव्याने बांधणे. | 127<br>ऑक्टोंबर | 685<br>17/10/2015 | मंजूर |
| 123. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 106 मधील मोडकळीस आलेली सर्व गटारे नव्याने बांधणे. | 128<br>ऑक्टोंबर | 686<br>17/10/2015 | मंजूर |
| 124. | **सौ. पुनम मिथुन पाटील, यांजकडून :-** प्र. क्र. 106 शहाबाज-फणसपाडा गावालगत असलेल्या उघडा नाला नव्याने बांधणे. | 129<br>ऑक्टोंबर | 687<br>17/10/2015 | मंजूर |
| | **श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 67, नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातील तुर्भे, अे/1, से-21, फेज-2 मध्ये नवी मुंबई महापालिकेच्या वतीने "सांस्कृतिक भवन" बनविणे. | 130<br>ऑक्टोंबर | 17/10/2015 | सदस्य सभागृहात नसल्यामुळे बारगळला |
| 125. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्र. क्र. 108 अंतर्गत, स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण प्रभागातील रस्त्यांवर सी. सी. टी.व्ही. कॅमेरे उभारणे. | 131<br>ऑक्टोंबर | 688<br>17/10/2015 | मंजूर |
| 126. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्र. क्र. 108, सेक्टर 48 येथील साईबाबा मंदिर , साईमहल सोसायटीजवळील फुटपाथवर ज्येष्ठ नागरिक निवारा शेड उभारणे. | 132<br>ऑक्टोंबर | 689<br>17/10/2015 | मंजूर |
| 127. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्र. क्र. 108, स्वच्छता आणि आरोग्य या गोष्टींना बाधक ठरणा-या आणि अस्वच्छतेस जबाबदार घटकांवर कठोर कारवाई करण्यासाठी नियम बनवणे अथवा अस्तित्वात असतील तर त्यांची अंमल बजावणी तात्काळ करणे. | 133<br>ऑक्टोंबर | 690<br>17/10/2015 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 128. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 55, कोपरखैरणे, सेक्टर 12E “गुडवील अशीयाना ते मायकल अंकल हाऊस पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 134<br>ऑक्टोंबर | 691<br>17/10/2015 | मंजूर |
| **अ. क्र.** | **नगरसेवकांची नांव आणि संक्षिप्त विषय** | **विषय क्र. व महिना** | **ठराव क्र. व दिनांक** | **अभिप्राय** |
| 129. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 55, कोपरखैरणे, जेष्ठ नागरीकासाठी जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र तयार करुन त्यांच्या बसण्यासाठी व्यवस्था करणे. | 135<br>ऑक्टोंबर | 692<br>17/10/2015 | मंजूर |
| 130. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 55, कोपरखैरणे, येथील खैरणे गावातील जयहींद मेडीकल ते खैरणे गांव दफनविधी पर्यंत Duct बांधणे. | 136<br>ऑक्टोंबर | 693<br>17/10/2015 | मंजूर |